# डिजीटल इंडीया सप्ताह

## दिनांक 2 जुलै ते 7 जुलै 2015

## कार्यशाळा- राज्य माहिती संचयिका

**दिनांक 4 जुलै, 2015 वेळ दुपारी 3.00 वाजता**

**स्थळ- परिषद सभागृह 6 वा मजला, मंत्रालय (विस्तार)**

**सहभाग- नोडल अधिकारी (राज्य माहिती संचयिका)**
**मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (सर्व)**
**व त्यांचे अधिनस्थ सर्व विभाग (आयुक्तालये, संचालनालये)**

---

**अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग**

## राज्य माहिती संचयिकेच्या वापरासाठी / संचयिकेस अधिकाधिक संपन्न करण्यासाठी सर्व विभागांकडुन अपेक्षित कार्यवाही-

ज्या विभागांच्या स्वतंत्र संकेतस्थळ कार्यरत आहेत त्यांचेबाबत-

१. विभांगाकडे डिजीटल स्वरुपात असलेल्या संग्रहीत आकडेवारापैकी राज्य माहिती संचयिकेत अंतर्भूत करण्यायोग्य माहिती निश्चित करणे
२. राज्य माहिती संचयिकेत अंतर्भुत करण्यासाठीचे संच संचालनालयास उपलब्ध करुन देणे
३. विभागांनी त्यांच्या संकेतस्थळावरील जी माहिती राज्य माहिती संचयिकेत समाविष्ट करावयाची आहे त्या आकडेवारीचे गुण विशेष (Attributes) निश्चित करुन ती आकडेवारी वेब सर्व्हीसद्वारे राज्य माहिती संचयिकेत उपलब्ध करुन देणे
४. राज्य माहिती संचयिकेत समाविष्ट करावयाच्या माहितीची/आकडेवारीची वारंवारीता निश्चित करावी. उदा. दैनिक, साप्ताहीक, पाक्षिक, मासिक, तिमाही, सहामाही इ.
५. संकेतस्थळावर नवीन माहितीचा समावेश केल्यानंतर ती माहिती राज्य माहिती संचयिकेत समाविष्ट करण्यायोग्य असल्यास ती माहिती संचालनालयास उपलब्ध करुन देणे
६. या संचालनालयाकडे उपलब्ध करुन दिलेल्या माहितीवरुन जे तक्ते, अहवाल, निष्कर्ष राज्य माहिती संचयिकेत प्रदर्शित करणे अपेक्षित आहे त्याचे नमुने निश्चित करणे
७. राज्य माहिती संचयिकेत उपलब्ध असलेली माहिती इतर विभागांना आवश्यक असल्यास तसे या संचालनालयास कळविणे, सदरची माहिती वेब सर्व्हीसद्वारे वापरण्यासाठी इतर विभागांना सुविधा उपलब्ध करुन दिली जाईल

**राज्य माहिती संचयिकेच्या वापरासाठी / संचयिकेस अधिकाधिक संपन्न करण्यासाठी सर्व विभागांकडुन अपेक्षित कार्यवाही-**

ज्या विभागांचे स्वतंत्र संकेतस्थळ उपलब्ध नाही त्यांचेसाठी-

१. विभागांना त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या आकडेवारीच्या संगणकीकरणासाठी संचालनालय मदत करेल.
२. विभागांना त्यांच्या उपयोगासाठीची नियमीत आकडेवारी संगणकीय प्रणालीद्वारे गोळा करण्यासाठीची सुविधा उपलब्ध करुन दिली जाईल.
३. संगणकीय प्रणालीद्वारे उपलब्ध झालेल्या माहितीवरुन आवश्यक ते तक्ते, निष्कर्ष तयार करण्यासाठी संचालनालय मदत करेल. हे निष्कर्ष, अहवाल संबंधित विभागांच्या मान्यतेनुसार राज्य माहिती संचयितेत प्रदर्शित करण्यात येतील.